आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२ एप्रिल २०२४ - मंगळवार

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे वर्धा लोकसभा मतदार संघातले उमेदवार अमर काळे यांनी आज अर्ज भरला. स्वाध्याय मंदिरापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत त्यांनी रॅली काढली. पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी या रॅलीपूर्वी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं.

परभणीमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संजय जाधव यांनी आज उमेदवारी अर्ज भरला. विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या फौजिया खान यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. त्यापूर्वी त्यांनी शनिवार बाजार ते जिल्हाधिकारी कार्यालय अशी रॅली काढली होती.

शिवसेनेचे बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार प्रतापराव जाधव यांनी आज उमेदवारी अर्ज भरला. यावेळी राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील उपस्थित होते.

**<><><><><><>**

सांगली जिल्हयाच्या कंवठेमहाकाळ तालुक्यात आज झालेल्या अपघातात चार ऊसतोड कामगारांचा मृत्यु झाला असून १० जण जखमी झाले आहेत. रत्नागिरी नागपूर हायवेवर ऊसतोड कामगार असलेल्या ट्रॅक्टरला भरधाव आयशर टेम्पो नं पाठीमागून धडक दिल्यानं हा अपघात झाला. कवठेमहाकांळ तालुक्याच्या आगळगाव फाटा इथं हा अपघात झाला.

**<><><><><><>**

आगामी लोकसभा आणि काही राज्यातल्या विधानसभा निवडणूकांच्या कामावर लक्ष ठेवण्यासाठी निवडणूक आयोगानं विशेष निरिक्षकांची नियुक्ती केली आहे. पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि बिहार या सात कोटी पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या राज्यांसाठी त्याचबरोबर विधानसभा निवडणूका असलेल्या

आंध्र प्रदेश आणि ओडिशा या राज्यांसाठी ही नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्रात निवृत्त आयएएस अधिकारी धर्मेंद्र एस. गंगावार यांची विशेष सर्वसाधारण निरिक्षक म्हणून तर विशेष पोलिस निरिक्षक म्हणून निवृत्त आयपीएस अधिकारी एन.के. मिश्रा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

<><><><><>

नवी मुंबई इथल्या खैरणे एमआयडीसीतल्या नवभारत इंडस्ट्रीयल केमिकल या रासायनिक कंपनीत आज सकाळी ११ च्या सुमाराला आग लागली. ही आग अद्याप धुमसत असून मोठ्या प्रमाणात पसरली आहे. नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन विभागाच्या नेरूळ, ऐरोली, कोपरखैरणे तसंच वाशी विभागाच्या बंबांसह एमआयडीसीच्या अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी तैनात असून आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

<><><><><>

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात आज सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत ९ नक्षलवादी ठार झाले आहेत. केंद्रिय राखीव दल, कोबरा बटालियन आणि जिल्हा राखीव पोलिसांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. बिजापूर जिल्ह्याच्या बस्तर विभागातील गंगापूर भागात ही कारवाई करण्यात आली. चकमकीनंतर पोलिसांना ४ नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले असून एक हलकी मशीनगन, ग्रॅनेड लाँचर आणि इतर शस्त्र आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे. या ठिकाणी शोधमोहिम सुरू आहे.

<><><><><>

अमरावती जिल्ह्याच्या वरुंड शहरातल्या भवानी चौक परिसरात आज पहाटे झालेल्या दोन सिलेंडरच्या भीषण स्फोटात दोन जण ठार तर एक जण गंभीर

जखमी झाला आहे. मृतांमधली एक व्यक्ती मनोरुग्ण असल्याची शक्यता स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

<><><><><><>

२०२३-२४ या आर्थिक वर्षाकरता राज्याच्या वित्त विभागाकडून प्राप्त झालेला २०० कोटीं रुपयांचा निधी सिंधुदुर्ग जिल्हा नियोजन मंडळानं १०० टक्के खर्च केला असल्याचं सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी किशोर तावडे यांनी आज बातमीदारांना सांगितलं. या निधीचा विनियोग करण्यासाठी नियोजन मंडळानं खर्चाचा आराखडा मंजूर करून घेतला होता. त्यासाठी मंडळानं १३१ योजना आखल्या होत्या.

<><><><><><>

नागरी उड्डाण मंत्रालयानं विस्तारा एअरलाइन्सकडून उड्डाण विलंबाबाबत अहवाल मागवला आहे. नागरी उड्डाण मंत्रालय विस्तारा उड्डाणे रद्द करण्याच्या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे, उड्डाण रद्द झाल्यास किंवा उशीर झाल्यास प्रवाशांच्या सुविधा सुनिश्चित करण्यासाठी विमान कंपन्यांनी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या (DGCA) नियमांचं पालन केलं पाहिजे, असे मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा सामना लखनऊ सुपर जायंट्सशी होणार आहे. बेंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल. काल झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं मुंबई इंडियन्सचा ६ गडी राखून पराभव केला. राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी

करताना मुंबईनं निर्धारित षटकांत ९ गडी बाद १२५ धावा केल्या. तर राजस्थाननं १२६ धावांचं लक्ष गाठताना ४ बाद १२७ धावा केल्या.

**<><><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं आपल्यासाठी सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या **आजच्या** भागात आपण रामटेक लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल.

**//<><><><><><>//**